**CNR No.MHSI01000723-2024**

<u>निशाणी ९५ खालील आदेश</u>

अर्जदार यांनी सामनेवाले नं. २८अ यांचे वारस दाखल करण्याकरिता झालेला विलंब व झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल होऊन मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार व सामनेवाला यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अर्जदार यांचे अर्जामध्ये कथन की, सामनेवाले नं. २८अ शिवराम सोनबा सावंत हे दि. २४/०६/२०१७ रोजी मयत झाले आहेत. सामनेवाला नं. २८अ हे निशाणी ५७ दि. १८/१०/२०२४ रोजीचे बेलिफ अहवालानुसार मयत असल्याचे अर्जदार यांना समजले. सदर सामनेवाला यांचे वारस दाखल करणेस अर्जदार यांने जाणीवपुर्वक विलंब केलेला नाही. सदर सामनेवाला मयत असलेबाबत कोणतीही माहिती नव्हती. अर्जदार यांचे कुटुंबिय नोकरीनिमित्त मुंबई येथे असल्याने त्यांना माहिती मिळू शकली नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जाकामी वारस रेकॉर्डवर आणणेकरिता ७ वर्षे ६ महिने व ५ दिवस एवढा विलंब झाला. त्यामुळे त्यांचेविरुध्द अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. सदर विलंब माफ होऊन व झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

३. सामनेवाले यांनी अर्जावर म्हणणे देऊन तीव्र विरोध केलेला आहे.

४. अर्जदार यांच्या अर्ज व त्यावरील सामनेवाले यांचे म्हणणे याचा विचार करता अर्जदार यांनी सामनेवाले २८अ यांचे वारस वेळेत अपिलामध्ये समाविष्ट

केलेले नाहीत. त्यामुळे त्यांचेविरुध्द अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. सदर सामनेवाला मयत असलेबाबत कोणतीही माहिती नव्हती. अर्जदार यांचे कुटुंबिय नोकरीनिमित्त मुंबई येथे असल्याने त्यांना माहिती मिळू शकली नाही. सामनेवाले नं. २८अ यांचे वारस अपिलाकामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अपिलाचा अंतिम गुणदोषावर निकाल होण्यासाठी अपेलंट यांना संधी देणे योग्य व न्यायाचे होणारे आहे. त्यामुळे अर्जदार याने दिलेले कारण योग्य व संयुक्तिक असल्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदार यांचा निशाणी ९५ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामेनेवाले नं. २८अ यांचा झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. सामनेवाले नं. २८अ यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR

Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2026.04.16 17:52:29 +0530

सिंधुदुर्ग – ओरोस
दिनांक : १६/०४/२०२६

(एस्. एस्. इंदलकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.